2114

॥ विद्या ददाति विनयं ॥


*Shree Saraswati Vidyaprasarak Mandal's*

**Smt. Padambai Kapurchandji Kotecha Mahila Mahavidyalaya, BHUSAWAL 425201**

Prof. G. D. Dhande (M. Sc.)
Principal


Ref No. ममवि/ १३०२ /९१-९२. Date - १०-३-९२.


उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगांव.
12 MAR 1992
आवक क्र. 3934
विभाग ..........


प्रति,
मा. कुलसचिव (परीक्षा),
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव.

विषय :- प्रथम वर्ष वाणिज्य १) आवश्यक मराठी २) ऐच्छिक मराठी.

महाशय,

सोबत प्रथम वर्ष वाणिज्यच्या १) आवश्यक मराठी व २) ऐच्छिक मराठी या संदर्भातील पुणे विद्यापीठाची खालील परिपत्रके पाठवीत आहे.

१) पत्रक सी.जी.सी/९७५ दि. १४-८-९०.
२) परिपत्रक क्र. १५८/९० दि. १२-६-९०
३) परिपत्रक क्र. २७४ दि. २९-६-९१.
४) परिपत्रक क्र. २७७ दि. १-७-९१.

वरीलपैकी क्र. (३) व (४) ची परिपत्रके १५ ऑगस्ट ९० नंतर निघालेली असल्यामुळे ती उ.म.वि.स लागू नाहीत. म्हणजे क्र. (१) व (२) प्रमाणे प्रथम वर्ष वाणिज्य च्या विद्यार्थ्यांना सन ९१-९२ साठी आवश्यक इंग्रजी किंवा आवश्यक मराठी हे विषय पहिल्या पेपरसाठी घेता येतात व सातव्या पेपरसाठी ऐच्छिक इंग्रजी/ऐच्छिक मराठी/हिंदी इ. विषय घेता येतात. आमच्या महाविद्यालयामध्ये त्याप्रमाणे विषय निवड झालेली आहे.

त्याप्रमाणे निवड करणारी महाविद्यालये जरी संख्येने कमी असली तरी उ.म.वि. परिपत्रक क्र. ९१/३८/१८२२ दि. २२-८-९१ नुसार १५ ऑगस्ट ९० नंतर पुणे विद्यापीठाने केलेले बदल उ.म.वि.स लागू नसल्यामुळे परिपत्रक क्र. १५८ प्रमाणेच प्रश्नपत्रिका काढणे उचित होईल.

त्यानुसार खालीलप्रमाणे प्रश्नपत्रिका काढावी लागेल.

अ) आवश्यक मराठी :-

पहिली सहामाही :- प्रथम वर्ष वाणिज्य मराठी पाठ्यपुस्तक विद्यापीठ प्रकाशन, संपादक डॉ. जोगळेकर व इतर (१९९०).
दुसरी सहामाही :- व्यावहारिक मराठी - विद्यापीठ प्रकाशन.

ब) ऐच्छिक मराठी :-

पहिली सहामाही :- मराठी ग्रामीण कथा, संपादक-अंबादास माडगूळकर व खाडिलकर, प्रकाशन :- श्रीविद्या वाचन भांडार, पुणे
दुसरी सहामाही :- गुंतता हृदय हे.

मात्र काही महाविद्यालयांनी पुणे विद्यापीठ परिपत्रक २७७ नुसार आवश्यक मराठी बंद करून तीन पुस्तके ऐच्छिक मराठीसाठी निवडलेली असल्यास त्यासाठी वर दिलेली (अ) ही प्रश्नपत्रिकाच त्यांना ऐच्छिक मराठी म्हणून चालेल व

Examined 5/4
12/3/92

(मागे पहा)

त्यानुसार परीक्षेचे वेळापत्रक करावे लागेल किंवा दोन्हीं पेपर त्यांना ठेवून वेळापत्रक करावे लागेल.

त्यासाठी खालीलप्रमाणे तीन प्रश्नपत्रिका काढाव्या लागतील.

१) आवश्यक मराठी साठी १ प्रश्नपत्रिका.
२) ऐच्छिक मराठी साठी दोन प्रश्नपत्रिका पहिली आवश्यक मराठीच्या अभ्यासक्रमावर व दुसरी ऐच्छिक मराठीच्या अभ्यासक्रमावर अशा दोन प्रश्नपत्रिका एकत्र छापल्या तरी चालतील.

तरी योग्य ते करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रा. पी. डी. घाडे)
श्रीमती प. क. कोटेचा महिला महाविद्यालय,
भुसावळ.

Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Date - 3 AUG 1990
PRINCIPAL

पुणे विद्यापीठ

जा.क्र.सीबीसी/८७५ दिनांक: १४/८/१९९०.

मा.प्राचार्य,
सर्व संलग्न वाणिज्य महाविद्यालये,

विषय: प्रथम वर्ष वाणिज्य वर्गासाठी मराठी या विषयासंबंधी---

संदर्भ : परिपत्रक क्र.१९६/९०, दि.२५ जुलै, ९०

महोदय,

आपणास या पूर्वी दि.२५ जुलै, ९० रोजी पाठवलेले परिपत्रक क्र.१९६/९० कृपया पहावे. सदरहू परिपत्रकात वाणिज्य साठी ज्यांनी मराठी माध्यम घेतले आहे अशा विद्यार्थ्यांनी आवश्यक मराठी हा विषय घ्यावयाचा आहे, अशा प्रकारे कळविण्यात आले आहे. तसेच पहिल्या सहामाहीत आणि दुसऱ्या सहामाहीत नेमण्यात आलेल्या पुस्तकांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परिपत्रक क्र.१९६/९० अनुसार बहुतेक महाविद्यालयांनी कार्यवाही अद्यापपर्यंत केलेली असेलच. तथापि काही महाविद्यालयांकडून या परिपत्रकातील तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत काही अडचणी विद्यापीठाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. त्या विचारात घेऊन विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास परिपत्रक क्र.१९६/९० च्या अंमलबजावणीबाबत असा खुलासा करण्यात येत आहे, की ज्या महाविद्यालयांना परिपत्रक क्र.१९६/९० ची कार्यवाही करण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण न आल्याने त्यांनी सदरहू परिपत्रकात नमूद केल्यानुसार मराठी विषयाच्या संदर्भात कार्यवाही केली असेल अशा महाविद्यालयांनी ती कार्यवाही पुढे चालू ठेवावी. तसेच ज्या महाविद्यालयांना सदरहू परिपत्रकाच्या अंमलबजावणीबाबत अडचणी उपस्थित झाल्या असतील त्या महाविद्यालयांनी १९६/९० परिपत्रक निघण्यापूर्वी मराठी विषयाबाबत जी काही व्यवस्था केलेली असेल तीच व्यवस्था शैक्षणिक वर्ष १९९०-९१ पुरती पुढे चालू ठेवावी. मात्र असे करताना कोणत्याही शिक्षकाचा कार्यभार कमी होणार नाही अशी दक्षता आपण घ्यावी.

आपला विश्वासू,
उपकुलसचिव,
(शैक्षणिक)

४३५३/१९९०/गो/-

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

परिपत्रक क्र. १२ /१९९२

विषय :- प्रथम वर्ष कला, विज्ञान शाखांचा सुधारित अभ्यासक्रम व प्रथम वर्ष वाणिज्य भूगोल या विषयाचा सुधारित अभ्यासक्रम.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यांत येते की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांत सोबत जोडल्याप्रमाणे सुधारित अभ्यासक्रम जून, १९९२ पासून अमलात येईल. या परिपत्रकासोबत नवीन अभ्यासक्रम जोडलेला आहे.

तसेच प्रथम वर्ष वाणिज्य शाखेकरीता वाणिज्य भूगोल या विषया व्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयाचे अभ्यासक्रमांत बदल करण्यांत आलेला नाही, कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांना विनंती की, त्यांनी या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधित प्राध्यापकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या नजरेस आणावा ही विनंती.

जा. क्र. कविपा/अभ्यासक्रम/९२/६३/२६/३५७२
दिनांक : २३. ४. १९९२
जळगांव.

सहा. कुलसचिव.

प्रत माहितीसाठी सादर रवाना :-

१] मा. अधिष्ठाता, कला, विज्ञान, वाणिज्य व मानसनीती, समाजशास्त्र विद्याशाखा.
२] सर्व संलग्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे मा. प्राचार्य.
३] मा. उपकुलसचिव [शैक्षणिक विभाग]
४] मा. सहा. कुलसचिव [परीक्षा विभाग]
५] मा. कक्षाधिकारी [रेकॉर्ड विभाग]

डीबी./

२

"अंतरी पेटवू ज्ञानज्योत"
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५ ००१.

* परीपत्रक क्र. ४६/१९९२ *

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सर्व संबंधितांच्या माहिती-साठी कळविण्यात येते की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांमध्ये बी.ए., प्रथम वर्ष "हिंदी" या विषयाचा जो अभ्यासक्रम पाठविण्यात आलेला आहे, त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात येत आहे.

१] पाठ्यपुस्तक - या शिर्षकाखाली पुढील प्रमाणे वाचण्यात यावे.
"अक्षरधारा" [प्रकाशन : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव]

२] त्याचप्रमाणे प्रथम वर्ष बी.ए./बी.कॉम्., सक्तीचे इंग्रजी या विषयासाठी Pleasure of English या शिर्षकाचे पुस्तक उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून प्रसिध्द केले जात असून ते लवकरच उपलब्ध होईल.

३] एम्.ए. भाग पहिला - प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नवीन अभ्यासक्रम अमलात आणावयाचा आहे. एम.ए., भाग २ च्या विद्यार्थ्यांसाठी १९९२-९३ या वर्षासाठी जुनाच म्हणजे १९९१-९२ साठी जो अभ्यासक्रम होता तोच शिकवावयाचा आहे.

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना विनंती की, त्यांनी या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधित प्राध्यापकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या नजरेस आणावा ही विनंती.

जा. क्र. अभ्यासक्रम/९२/६/२६/४३२७.
दिनांक : १९.०५.१९९२.

सहाय्यक कुलसचिव,

प्रत माहितीसाठी सादर रवाना :-
१] मा. अधिष्ठाता, कला, विज्ञान, वाणिज्य व मानसनिती, समाजशास्त्र विद्याशाखा.
२] सर्व संलग्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे मा. प्राचार्य.
३] मा. उपकुलसचिव, [शैक्षणिक विभाग]
४] मा. सहाय्यक कुलसचिव, [परीक्षा विभाग]
५] मा. कक्षाधिकारी, [रेकार्ड विभाग]

-----

नि/०२०/१९५९२.